# संपादकीय...

## ठाणे महापालिका स्मार्ट मीटर्स बसविणार : हौसिंग सोसायट्यांना खुषखबर



**सीताराम राणे**
संपादक

ठाणे महापालिका कार्यक्षेत्राखाली तब्बल १ लाख १३ हजार नळ जोडण्यांना पाण्याचे मीटर बसविले जाणार आहेत. तसा ठराव ठाणे महापालिकेत दिनांक २८ फेब्रुवारी २०१८च्या आमसभेत पारित झाला. मात्र ठाणे महापालिकेतील नगरसेवकामंध्ये मतभेद झाले आणि नवी मुंबईत हा प्रयोग यशस्वी झाला नाही तो ठाणे शहरात होईल काय? असा मुद्दा काही नगरसेवकांनी उपस्थित केला. परंतु प्रशासनाने सर्व माहिती दिल्यानंतर हा ठराव पारित झाला. मात्र महासभेत नगरसेवकांमध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये नागरीकांच्या हिताची बाजू कुठल्याही नगरसेवकाने मांडली नाही म्हणजे या अगोदर प्रति फ्लॅट व प्रति झोपडीप्रमाणे पाण्याचे बिल आकारले जात होते. मात्र दोन वर्षापूर्वी निवडणूकीच्या तोंडावर असाच अकस्मात ठराव करुन चौ. फुट दराने फक्त फ्लॅटधारकांना पाणीबिलाचे दर वाढविण्यात आले झोपडीधारकांना त्याच्यातून वगळण्यात आले होते त्याविषयी महासभेत करदात्या नागरीकांची बाजू कोणी मांडल्याचे एकीवात नाही.

खरं म्हणजे हे जेवढे पाणी वापराल तेवढयाच पाण्याचे बिल करणे अपेक्षित असते मा. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा मुंबईतील एका दाव्यामध्ये हा निर्णय दिलेला आहे. तरीसुध्दा चौ. फुट दराप्रमाणे पाणीबिल आकारण्याचा ठराव कसा काय संमत होतो. हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. ठाणे महानगरपालिकेतील काही नगरसेवकांनी मिटर लावण्याची पध्दत यशस्वी होईल की नाही यावर शंका उपस्थित केली आहे. मात्र ज्या नागरीकांनी त्यांना निवडून दिले आहे त्यांच्यावर कराचा बोजा कमी होणार किंवा तो कमी व्हावा असे उपस्थित करणाऱ्या नगरसेवकांना का वाटू नये? मात्र या घटनेमुळे आम्हांस दोन वर्षांपूर्वीची घटना आठवली.

२०१७ मध्ये ठाणे महापालिकेची पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाल्यावर घाईघाईत हा ठराव ठाणे महापालिकेने अमलात आणला. तेव्हा ठाणे हौसिंग फेडरेशनच्या माध्यमातून सहकारी गृहनिर्माण संस्थांवरील पाणीपट्टीच्या दरवाढी विरुद्ध आवाज उठविण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे ठाणे शहराच्या विविध भागांत जाहीर सभा घेऊन गृहनिर्माण संस्थांवरील अन्याय त्वरित दूर करण्याची मागणी केली.

गृहनिर्माण संस्थांवरील अन्यायकारक पाणीपट्टी काढून टाकावी आणि फक्त मीटर पद्धतीने वितरित केलेल्या पाण्यावरच पाणी पट्टी आकारावी अशी मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाला सादर केली. ठाणे महापालिकेने आता नळ संयोजनात पाण्याचे मीटर लावून पाणीपट्टी आकारण्याचे ठरविले आहे. वास्तविक महापालिकेतील सर्व नगरसेवकांनी ही मागणी मान्य करावयाला हवी होती. कारण नागरिकांवर कराचा बोजा कमी होणार आहे. परंतु तसे न होता काही नगरसेवकांनी विरोधासाठी विरोध करायचा म्हणून

आरोपांची राळ उठवली. परंतु दुर्देवाची बाब म्हणजे कोणत्याही नगरसेवकाने मीटर पध्दतीची उपयुक्तता महासभेत मांडली नाही.

या मीटर पद्धतीवर स्मार्ट सिटी मिशन योजनेतून ८३ कोटी रुंपये मिळणार आहेत. याचा अर्थ हे मीटर बसविण्यासाठी ठाणेकरांना एक पैसाही खर्च करावा लागणार नाही सध्याच्या पाणी वितरणातील सुमारे ३७ टक्के पाणी गळती होते. हे केलेल्या सर्वेक्षणावरून सिद्ध झाले असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गेली काहीं वर्षे पावसाचे प्रमाण कमी होतं चालले आहे. तसेच अनियमितपणाही मोठ्या प्रमाणावर आढळतो. पाणी हे जीवन आहे. केवळ माणसांनाच पाण्याची गरज असते असे नाही. सर्व प्रकारच्या पशु-पक्ष्यांना, प्राण्यांना, झाडांना, स्वच्छतेसाठी, तहान मिटविण्यासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणावर गरज लागते. पाण्याची ही वाढणारी टंचाई केवळ भारतापुरती मर्यादित नाही. ही जागतिक समस्या आहे. तिसरे महायुद्ध पाण्यावरून होऊं शकेल असे बोलले जात आहे.

पावसाच्या कमी प्रमाणामुळे भूगर्भात पाणी जास्त नाही. अशातच कुपनलिकेद्वारे पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणावर होत असल्यानेही भूगर्भातील पाण्याची पातळी कशी घटत आहे, त्या बाबत ठाणे जिल्ह्यांतील काही शहरांची आकडेवारी आम्ही यापूर्वी हौसिंग हेरल्डमध्ये प्रसिद्ध केली आहे.

सोसायट्यांनी पाण्याचा वापर कमी करावा, इतर कामांसाठी रेन हार्वेस्टिंग करावे असे शासनांतर्फे अनेक प्रयत्न झाले. परंतु गृहनिर्माण संस्थांनी रेन हार्वेस्टिंगकडे पाठ फिरविली आहे. याची चूक येत्या पावसाळ्यात दुरुस्त करावी असे आम्हांस वाटते.

ठाणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी नियमित वाजवी पाणी पुरवठा व्हावा, वितरण करतांना पाण्याची गळती होणार नाही, बेकायदा पाण्याचा वापर केला जाणार नाही. म्हणून नळांवर मीटर बसविले जातील अशी ठाणे महापालिकेने ११ वर्षांपूर्वी घोषणा केली होती. सुमारे ११ वर्षानंतर ठाणे महापालिकेने याबाबत ठोस पाऊल उचललेले दिसते. अर्थात याचे श्रेय स्मार्ट सिटी मिशन योजनेला आहे, आणि आयुक्त मा. संजीव जयस्वाल यांना जाते. हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. या योजनेत मीटर खरेदी करण्यापासून तो बसविण्यापर्यंतचा खर्च स्मार्ट सिटी मिशन योजनेतून होणार आहे. त्यामुळे ठाणेकर नागरिकांना हा भुर्दंड पडणार नाही. हे मीटर एआरएमचे सेमी ऑटोमॅटिक मीटर असणार आहेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यासाठी वेगळ्या बजेटची तरतूद करण्यात आली आहे. अशी माहिती अभियंत्यांनी सांगितले आहे. या शिवाय जुन्या जलवाहिन्या काढून टाकून नवीन जलवाहिन्या बसविल्या जाणार आहेत. कांही जलवाहिन्यांची दुरुस्ती केली जाणार आहे.

थोडक्यात ठाणे महापालिकेने मीटर पद्धतीने पाणी पुरवठा करण्याचे ठरवून स्मार्ट सिटी साठी एक पाऊल पुढे टाकले आहे. याबद्दल ठाणे महापालिकेचे आणि खासकरुन महापालिका आयुक्त श्री. संजय जयस्वाल यांचे अभिनंदन करतो. मात्र सध्या हा प्रकल्प नियोजनाच्या अवस्थेतच आहे. आणखी वेळ न दवडता पुढील उपाययोजना शीघ्र गतीने झाल्या पाहिजेत. निदान वर्ष दोन वर्षात महापालिका क्षेत्रातील सर्व म्हणजे १ लाख १३ नळांवर मीटर बसविले गेले पाहिजेत. मात्र एकीकडे पाण्याची टंचाई आहे. तर दुसरीकडे ठाणे शहराच्या परिसरांत टॉवर्सचे बांधकाम जोमदारपणे चालू आहे. या इमारतीतील सदनिकाधारकांना मीटर पद्धतीने पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित विकासकांवर सोपविली पाहिजे. कारण आतां एक बी एच के चे फ्लॅट सुद्धा एक कोटी रुपयांच्या पलीकडे गेले आहेत, जात आहेत आणि जाणार आहेत. त्याप्रमाणे मिटर जोडणी झाल्यानंतर लगेच मिटरप्रमाणे पाण्याच्या बिलाची आकारणी होणे अवश्यक आहे. तेव्हां, शुभस्य शिघ्रम.

**- सीताराम राणे**
**संपादक**